# कार्यालय,नागपूर महानगरपालिका,नागपूर.

**(हिवताप व हत्तीरोग विभाग)**

जा.क्रमांक :— 531 /हि.व ह.अ. दिनांक :— 27 / 11 /२०१७

प्रति,

इंचार्ज,
ई—गव्हर्नस विभाग,
म.न.पा.,नागपुर.

**विषय** :— माहितीचा अधिकार अधिनियम — २००५ अंतर्गत साधारणपणे मागणी करण्यात येत असलेली माहिती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर अपलोड करण्याबाबत.

**संदर्भ** :— जा.क्र.साप्रवि/३४/परि., दिनांक १४.११.२०१७.

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने नागपूर महानगरपालिकेच्या हिवताप व हत्तीरोग विभागामार्फत किटकजन्य आजारावर नियंत्रण ठेवण्यासाठी वर्षभर खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात येते.

१.झोन अंतर्गत येणाऱ्या प्रभागात साप्ताहिक अळीनाशक कार्यक्रम क्षेत्रीय कर्मचारी यांच्या मार्फत राबविला जाते.

२.डासोत्पत्ती स्थानाचा शोध घेऊन ज्या ठिकाणी डासोत्पत्ती स्थाने आढळली ती नष्ट करणे किंवा त्यात औषधी टाकणे.

३.रात्रकालीन सर्व्हेक्षणात आरोग्य कर्मचाऱ्यामार्फत हत्तीरोग रक्तनमुने गोळा करणे.

४.जिवशास्त्रीय कार्यक्रमात कुलर, पाण्याची टाकी, नविन बांधकाम साईड, साचलेले पाणी येथे गप्पीमासे सोडणे.

५.नाल्याचे पाणी, साचलेली डबकी यात फवारणी करण्यात येते.

६.डासांची घनता वाढत असलेल्या ठिकाणी धुरधुरळणी प्रभागनिहाय केली जाते .

७.बाहयलक्षणेयुक्त हत्तीरोग रूग्ण यांना हत्तीरोग विभागात उपचार केल्या जातो.

८.घरातील डासोत्पत्ती स्थाने जसे कुलर, ओव्हर हेड टॅक, छतावरील पावसाचे पाणी, बगीचातील अनउपयोगी सामान जसे फेकलेले चाहाचे ग्लास, नारळाच्या करवंटया, टायर, तुटले फुटलेले मडके, वाळलेली झाडाचे पाने, जुते, तसेच प्राण्यां करिता ठेवण्यात आलेले पिण्याचे पाणी, फुल दानी व यासारख्या अनेक वस्तु ज्यात पावसाचे पाणी साचल्याने डास अळी तयार होते याची तपासणी करून तेथील नागरीकांना माहीती देण्यात येते व डास अळी अबेट चे मदर सोलुशन वापरून नष्ट करण्यात येते.

९.आरोग्य शिक्षण व जनजागृती कार्यक्रम गर्दीच्या ठिकाणी जसे बस थांबा, रेल्वे स्टेशन, बगीचे, बाजार येथे करण्यात येतो.

Scanned by CamScanner

१०. शाळेतील मुलांना तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना किटकजन्य आजाराबाबत आरोग्य शिक्षण देण्यात येते.

११. प्रभातफेरी व दिंडी मार्फत जनसामान्यात किटकजन्य बाबत जागृती करण्यात येते.

१२. खाली असलेले प्लॉट मध्ये पाणी जमा झाल्यास फवारणी करण्यात येते.

१३. सेप्टीक टॅकमध्ये औषधीची फवारणी करणे.

१४. हिवताप व हत्तीरोग प्रयोगशाळेत रक्तनमुने तपासणी करून त्यांना औषधोपचार करण्यात येतो.

१५. नागपूर शहरातील गुरांचे गोठे असलेल्या ठिकाणी फवारणी करणे.

१६. सार्वजनिक उत्सव मध्ये किटकजन्य आजाराबाबत प्रदर्शनी करण्यात येते.

१७. बॅनर, पोस्टर, होर्डींग लावून जनजागृती करणे.

१८. आंगणवाडी, बचतगट, सामाजिक कार्यकर्ते यांचे द्वारे किटकजन्य आजाराबाबत लोकांपर्यंत माहिती देण्यात येते.

१९. किटक संग्राहक यांनी घरोघरी जाऊन गोळा केलेले डास यांचे विच्छेदन करणे.

२०. संशयीत डेंग्यु ताप रूग्ण आढळल्यास त्याचा रक्तजल नमुना सेंटीनल सेंटर द्वारे विभागात तपासल्या जातो.

२१. एक दिवशीय सामुदायीक औषधोपचार राबविणे.

२२. व्हेंट पाईपला जाळी बसविणे.

हिवताप व हत्तीरोग अधिकारी,
नागपूर महानगरपालिका,नागपूर

**प्रतिलीपी माहितीस्तव सविनय सादर :—**

१. मा.आयुक्त, म.न.पा.,नागपूर.
२. मा.अपर आयुक्त 2/3, म.न.पा.,नागपूर.
३. मा.उपायुक्त १/२, म.न.पा.,नागपूर.
४. मा.अति.उपायुक्त १, म.न.पा.,नागपूर.
५. मा.आरोग्य अधिकारी, म.न.पा.,नागपूर.

Scanned by CamScanner